३. उमेदवारांने ऑनलाईन आवेदन अर्ज भरताना जाहिरात डाऊनलोड करुन काळजीपूर्वक वाचावी.

४. अर्जदाराने फोटो आणि स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावे. फोटो ३५ केबीपेक्षा कमी असावा आणि स्वाक्षरी ३० केबीपेक्षा कमी असावी.

५. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया चलनची प्रिंटआऊट काढणे आवश्यक आहे. चलनात दर्शविलेल्या रक्कमेचा भरणा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत करण्यात यावा.

६. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर तयार होणाऱ्या चलनाची प्रिंटऑऊट काढून सदर चलनात नमुद फी (रक्कम) अर्ज सादर केल्यानंतर कामकाजाच्या दुसऱ्या दिवसापासुन स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत भरणा करावी. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये चलनाने फी जमा करण्याचा अंतिम दिनांक ०४/०९/२०१५ असेल.

७. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरलेनंतर त्याची स्थिती www.collectorpalghar.in किंवा http:184.95.41.73/pco/ या संकेतस्थळावर पहाता येऊ शकेल.

८. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा चालू ई-मेल आयडी व स्वत:चा अदयावत (Latest) फोटो असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडीद्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक आहे, तसेच स्वत:चा फोटो जिल्हा निवड समितीच्या सुचनेनुसार विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करताना फोटोची साईज **३५kb** पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. **तसेच उमेदवाराने स्वत:चे फोटो ओळखपत्र परीक्षेच्या दिवशी आणणे आवश्यक आहे.**

**९. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्र.चुकीचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्र. NCPR रजिस्टर्ड (Do Not Disturb) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास याची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तांत्रिक अडचणींना अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी पालघर हे जबाबदार राहणार नाही.**

**१०. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाच्या बाबींचा तपशील www.collectorpalghar.in किंवा http:184.95.41.73/pco/या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**११. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर <u>www.collectorpalghar.in</u> किंवा http:184. 95.41.73/pco/ या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही. प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही.**

## <u>पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती :-</u>

१. उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्र, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. परंतू ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेलास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्ज

